# प्रेसनोट

## गुंड शहबाज मुक्तार शेख टोळीतील चौघेजणांविरुध्द मोक्का अंतर्गत कारवाई

खडक पोलीस स्टेशन हद्दीत शहबाज मुक्तार शेख याने सन २०१४ पासुन योगेश मारुती गायकवाड रा. भवानी पेठ, पुणे, २) अजय ऊर्फ बटल्या संतोष कांबळे रा. कासेवाडी पोलीस चौकी पाठीमागे, पुणे, ३) राहुल ऊर्फ गुरुजी गणेश नेटके रा. सदर यांचेसह आपली संघटीत टोळी तयार करुन, जबरी चोरी, घरफोडी, गंभीर दुखापत असे १० गुन्हे केलेले आहेत. शहबाज मुक्तार शेख यास सन २०१७ मध्ये २ वर्षाकरीता पुणे जिल्ह्यातुन हद्दपार करण्यात आले आहे. परंतु त्याचे वर्तनात काही परिणाम दिसुन येत नव्हता. त्याचे इतर साथीदार योगेश गायकवाड, अजय ऊर्फ बटल्या कांबळे, राहुल ऊर्फ गुरुजी नेटके यांचेवर सुध्दा एकत्रित तसेच, स्वतंत्ररित्या जबरीचोरी, दुखापत, घरफोडी यासारखे गंभीर गुन्हे आहेत.

वरील आरोपींनी आपली टोळी करुन, संघटीतरित्या गुन्हे केल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे त्यांच्या कृत्यावर जरब बसावा म्हणुन, खडक पोलीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी तसेच पोलीस निरीक्षक संभाजी शिर्के यांनी मा. रविंद्र सेनगांवकर, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण विभाग, पुणे शहर यांचेकडे महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदा कलम ३(१)(ii),३(४) प्रमाणे कारवाई होणेकरीता मंजुरीकरीता प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार मा. रविंद्र सेनगांवकर, अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सदर आरोपींविरुध्द वरीलप्रमाणे कारवाईची परवानगी दिली.

गेले ६ महिन्यामध्ये पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये जबरी चोऱ्या, मारामारी, टोळी युध्द करणाऱ्या १० वेगवेगळ्या टोळ्यांच्याविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदा १९९९ (मोक्का) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.